तहसीलदार “गट-अ” संवर्गातील ०५ व नायब तहसीलदार "गट-ब" संवर्गातील ०५ परिविक्षाधीन उमेदवारांकरीता अधिसंख्य पदे निर्माण करणेबाबत...

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्रमांक:- पदनि-२०१९/प्र.क्र. ०६/ई-८
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : ०२ मार्च, २०१९.

संदर्भ:- १) शासन निर्णय, वित्त विभाग, क्र.पदनि-२०१६/प्र.क्र.७/१६/वित्तीय सुधारणा-१, दि.२०/०२/२०१६.
२) सामान्य प्रशासन विभागाचे पत्र क्र.टिआरएन-०६१८/प्र.क्र. ३३ (भाग-२)/ सीपीटीपी, दि. ०१/०१/२०१९.
३) सामान्य प्रशासन विभागाचे पत्र क्र.टिआरएन-०६१८/प्र.क्र. ३३ (भाग-२)/ सीपीटीपी, दि. ०९/०१/२०१९.
४) शासन निर्णय महसूल व वन विभाग, क्र.सीपीटीपी -२०१९/प्र.क्र.१८/ई-९, दि.१६/०१/२०१९.
५) शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्र.ससेनि-२५१९/प्र.क्र.१०/ई-३, दि.१७/०१/२०१९.

प्रस्तावना:-

सामान्य प्रशासन विभागाच्या संदर्भ क्र. २ येथील शासन निर्णयान्वये महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत राज्यसेवा परीक्षेद्वारे प्रतिवर्षी सरळ सेवेने नियुक्त होणाऱ्या गट-अ संवर्गातील उमेदवारांसाठी यशदा, पुणे व वनामती,नागपूर या दोन संस्थेमार्फत एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण देण्यात येते. त्यानुसार राज्य सेवा (मुख्य) परीक्षा-२०१६ च्या अंतिम निकालाच्या आधारे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने शिफारस केलेल्या व प्रशिक्षणास रुजू होण्यास मुदतवाढ दिलेल्या ०५ परिविक्षाधीन तहसीलदार, “गट-अ” व ०५ परिविक्षाधीन नायब तहसीलदार, “गट - ब” संवर्गातील एकूण १० उमेदवारांचे प्रशिक्षण दिनांक १६/०१/२०१९ पासून सुरु झाले आहे. त्याअनुषंगाने तहसीलदार “गट-अ” या संवर्गातील ०५ व नायब तहसीलदार “गट-ब” या संवर्गातील ०५ परिविक्षाधीन उमेदवारांचे वेतन अदा करण्यासाठी दोन वर्षासाठी अधिसंख्य पदे निर्माण करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

राज्य सेवा मुख्य परीक्षा-२०१६ अंतर्गत महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने शिफारस केलेल्या व सामान्य प्रशासन विभागाने प्रशिक्षणांतर्गत कार्यक्रमासाठी नियुक्त केलेल्या (प्रशिक्षणास रुजू होण्यास मुदतवाढ दिलेल्या) ०५ तहसीलदार, "गट-अ" व ०५ नायब तहसीलदार, "गट - ब" संवर्गातील एकूण १० अधिसंख्य पदे दि.१६/०१/२०१९ ते १५/०१/२०२१ या कालावधीकरिता खाली नमुद केलेल्या जिल्हाधिकारी / विभागीय आयुक्त, कार्यालयात निर्माण करण्यास शासन मान्यता देत आहे.

प्रशिक्षणार्थी तहसीलदार :-

अ.क्र.	परिविक्षाधीन प्रशिक्षणार्थीचे नाव	प्रशिक्षणासाठी तहसीलदार गट-अ संवर्गात अधिसंख्य पद निर्माण करावयाचा जिल्हा / विभाग
१	श्री. भालगटीया गौरव मांगीलाल	यवतमाळ, अमरावती विभाग
२	श्री. धुळधर निखील शामसुंदर	उस्मानाबाद, औरंगाबाद विभाग
३	श्रीमती पवार श्वेता सुरेश	पुणे, पुणे विभाग
४	श्रीमती पवार चारुशिला बाबुराव	अहमदनगर, नाशिक विभाग
५	श्री. मदने नितीन शशिकांत	सिंधुदुर्ग, कोकण विभाग

प्रशिक्षणार्थी नायब तहसीलदार :-

अ.क्र.	परिविक्षाधीन प्रशिक्षणार्थीचे नाव	प्रशिक्षणासाठी नायब तहसीलदार गट-ब संवर्गात अधिसंख्य पद निर्माण करावयाचा जिल्हा / विभाग
१	श्री. शिंदे रोहन भिमराव	रत्नागिरी, कोकण विभाग
२	श्री. वारडे प्रविणकुमार तुकाराम	बुलढाणा, अमरावती विभाग
३	श्रीमती काकडे प्रज्ञा पद्माकर	रायगड, कोकण विभाग
४	श्रीमती नांदे सायली अप्पासाहेब	अहमदनगर, नाशिक विभाग
५	श्री. जावडे गजानन विठ्ठलराव	नागपूर, नागपूर विभाग

६. सदरहू परिविक्षाधीन तहसीलदार व परिविक्षाधीन नायब तहसीलदार यांच्या प्रशिक्षणाच्या दि.१६/०१/२०१९ ते दि.१५/०१/२०२१ या कालावधीतील अधिसंख्य पदाच्या वेतनावरील होणारा खर्च परिविक्षाधीन उमेदवार जिल्हानिहाय प्रशिक्षणासाठी वर्ग केलेल्या जिल्ह्याकरिता "मागणी क्र. सी-१, २०५३- जिल्हा प्रशासन (००)(०९३) जिल्हा आस्थापना (०१) सर्व साधारण आस्थापना (०१)(०१)

आयुक्त कोकण (२०५३ ००२८)/ आयुक्त नाशिक (२०५३ ००४६)/ आयुक्त पुणे (२०५३ ००६४)/ आयुक्त अमरावती (२०५३ ००८२)/ आयुक्त नागपूर (२०५३ ०१०८)/ आयुक्त औरंगाबाद (२०५३ ०१२६) या लेखाशिर्षाखालील मंजूर अर्थसंकल्पीय अनुदानातुन भागविण्यात यावा.

७. शासन निर्णय, वित्त विभाग, क्र. पदनि २०१६/प्र.क्र.७/१६/वित्तीय सुधारणा-१, दि.२०/०२/२०१६ अन्वये प्रशासकीय विभागांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार सदर शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०१९०३०२१०४२०५१११९ असा आहे. उक्त शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Digitally signed by Ajit Sopanrao Deshmukh
Date: 2019.03.02 10:48:35 +05'30'

(अजित देशमुख)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) सर्व विभागीय आयुक्त.
२) जिल्हाधिकारी यवतमाळ/उस्मानाबाद/पुणे/अहमदनगर/सिंधुदूर्ग/रत्नागिरी/बुलढाणा/ रायगड/नागपूर.
३) महासंचालक, यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी (यशदा), पुणे.
४) संचालक, वसंतराव नाईक राज्य कृषी विस्तार व्यवस्थापन प्रशिक्षण संस्था, वनामती, बोले पेट्रोल पंपाजवळ, अमरावती रोड, नागपूर.
५) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
६) निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई.
७) जिल्हा कोषागार अधिकारी, यवतमाळ/ उस्मानाबाद/ पुणे/ अहमदनगर/ सिंधुदूर्ग/रत्नागिरी/ बुलढाणा/ रायगड/ नागपूर.
८) प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता / लेखापरीक्षा), महाराष्ट्र - १/२, मुंबई/नागपूर.
९) वित्त विभाग (वित्तीय सुधारणा-१), मंत्रालय, मुंबई - ३२.
१०) सामान्य प्रशासन विभाग (सीपीटीपी), मंत्रालय, मुंबई - ३२.
११) सह सचिव / उप सचिव (कार्यासन ब-१/ई-३ व ई-९) महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२.
१२) निवड नस्ती, कार्यासन ई-८, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२